**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. सुनिल नामदेव ठोंबरे, कच्छी निवास, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६४ / सातारा | उप अधीक्षक, ससून रुग्णालय, पुणे | अधिष्ठाता, ससून रुग्णालय, पुणे | दि.१६.६.२००६ च्या पंचायत समिती खंडाळा यांचे पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा व संबंधित सदर पत्रव्यवहाराचा संपूर्ण लेखी तपशील | अपिलातील मागणीच्या अनुषंगाने तीन घटकांत झालेल्या चर्चेनुसार श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांना दि. १६.९.२००८ रोजी ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे येथे तपासणीस बोलवून तपासणीनंतर सुधारित प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांची अपेक्षित असलेली मागणी पूर्ण झालेली असल्याने त्यानी अपील निकाली काढण्यास मान्यता दिलेली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्त्या सौ. सुनंदा गोपाळ जाधव, रा. २६, जिल्हा परिषद कॉलनी, शाहुपूरी, ता. जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६८ / सातारा | सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ | सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ | शासकीय अधिकाऱ्यांमार्फत कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी प्रतिनियुक्ती/ सेवावर्ग याबाबतची शासकीय नियमावली, मार्गदर्शक सूचना अथवा तत्वे यांचे लेखी स्वरूपातील आदेश | दि. २१.८.२००८ रोजी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीबद्दल उत्तर दिलेले आहे. अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्यास सहमती दर्शविली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १४.१०.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भाऊसाहेब ढगोबा भुजबळ
मु.पो.वाल्हे, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, (मळी/मद्यार्क),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त (निरीक्षण),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३९ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भाऊसाहेब ढगोबा भुजबळ
मु.पो.वाल्हे, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, (मळी/मद्यार्क),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई (तत्कालीन जन माहिती अधिकारी व सध्या अपिलीय प्राधिकारी)

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.५.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | सीएलतीन/३१६ लायसन्स बद्दल- माहितीचा कालावधी-सन १९९७ ते २००० |

## विवेचन

आपल्या दारु दुकानाच्या परवान्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.भाऊसाहेब ढगोबा भुजबळ यांनी जन माहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीपेक्षा दहा दिवस उशिरा त्यांना उत्तर पाठविले. त्यात काही माहिती दिली व अन्य सर्व प्रश्नांवर श्री.भुजबळ यांनी सल्ला मागितला असल्याने माहितीच्या अधिकारात तो येत नसल्याचे कळविले. त्याविरुध्द श्री.भुजबळ यांनी केलेल्या अपिलाची दखल घेण्यात आली नाही, असे श्री.भुजबळ यांचे म्हणणे आहे. त्याविरुध्द श्री.भुजबळ यांनी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म.रा.मुंबई यांच्याकडे अपील केले. जिल्हाधिकारी, पुणे यांनी श्री.भुजबळ यांना कागदपत्रे द्यावीत व त्यांच्या आदेशाविरुध्द अनुज्ञप्तीच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबतचे अपील नियमानुसार श्री.भुजबळ यांनी दाखल करावे, असा निर्णय त्यांनी दिला. असे अपील करण्याचे मान्य करुन श्री.भुजबळ यांनी अर्ज मागे घेतला. याच स्वरुपाची माहिती मागणारा अर्ज श्री.भुजबळ यांनी यापूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केला होता. तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडेही केला होता.

आपल्या दारु दुकानाच्या परवान्याच्या संदर्भात भागीदार घेणे अथवा काढणे या संदर्भात श्री.भुजबळ यांची मुख्य तक्रार आहे. त्यांना माहिती देण्यात आली आहे मात्र मुख्य तक्रारीची तड त्यांना संबंधित परवान्याच्या संदर्भात लागू असलेल्या कायद्यानुसार किंवा भारतीय दंडसंहितेनुसार लावून घ्यावी लागेल, असे राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी श्री.भुजबळ यांच्या आधीच्या अपिलावरील निर्णयात म्हटले आहे.

विविध अर्जाद्वारे सातत्याने श्री.भुजबळ हा विषय मांडत असून वेळोवेळी त्यांना याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.ए.बी.घाटोळ यांनी नमूद केले.

श्री.भुजबळ यांनी मुद्दा क्र.२ ते ४ मध्ये काही बाबतीत अभिप्राय विचारला असला तरी माहिती मागण्याच्या स्वरुपाचेही काही प्रश्न आहेत, ती माहिती त्यांना दिली जावी. मुख्य तक्रार प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) देय माहिती अपीलकर्त्याला आठ दिवसात द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहआयुक्त राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.१०.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण<br>संपादक झेप यांचे कार्यालय,<br>अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर, इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण संचालक, पुणे विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी दि. १.३.२००६ व दि. १०.७.२००६ रोजीचे निवेदनाद्वारे शरदचंद्र पवार शिक्षण प्रसारक मंडळ, पळशी, जि. सोलापूर येथील संस्थापक, अध्यक्ष, मुख्याध्यापक यांचे कथीत गैरव्यवहाराबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत सुस्पष्ट अहवाल व मा. राज्यपाल यांच्या दि. ५.७.२००६ च्या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल दि. ५.१०.२००६ च्या अर्जाद्वारे मागणी केला होता.

अद्याप माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितले. राज्यपालांकडे केलेला अर्ज अद्याप त्यांना प्राप्त झालेला नाही. तसेच शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून अहवाल प्राप्त झाला नसल्याने माहिती देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले.

आपसात झालेल्या चर्चेनुसार, एक महिन्यात अहवाल प्राप्त करून देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. शाळांची चौकशी करून माहिती हवी आहे. हा प्रत्यक्षात प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्यात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करून देण्याबाबत नमूद केले होते. त्यानुसार केलेल्या पूर्ततेचा अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २७ .१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १३-०५-२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक ९१ / कोल्हापूर | | उपस्थिती |
| २ | **अपीलकर्ता** | श्री. प्रविण दादासाहेब इंदुलकर, १९४९, राजारामपुरी ११ वी गल्ली, कोल्हापूर | गैरहजर |
| ३ | **जन माहिती अधिकारी** | परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |
| ४ | **अपिलीय प्राधिकारी** | कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रविण दादासाहेब इंदुलकर, १९४९, राजारामपुरी ११ वी गल्ली, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे ऑक्टोबर/नोव्हेंबर २००६ मध्ये एलएलबी (जुना म्हणजेच ३ वर्षाचा अभ्यासक्रम) या परीक्षेच्या प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्राच्या परीक्षेच्या (सिट नं २३५७) उत्तर पत्रिकेच्या झेरॉक्स प्रती व विद्यापीठाच्या ऑर्डीनन्स क्रमांक १०६ (अ) ची झेरॉक्स प्रत मागितली होती.

श्री. इंदुलकर यांनी यापूर्वी द्वितीय अपील (क्र. ८७/कोल्हापूर) आयोगाकडे दाखल केले होते. या अपिलाचा विषय व वरील अपिलाचा विषय सारखा आहे. त्यामुळे अपील क्र. ८७/कोल्हापूर मध्ये दिनांक २३.६.२००८ रोजी आयोगाने दिलेले आदेश या अपिलात कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०-१०-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. बबन बाबुराव गुरव, रा. कोयना सायडींग, ओगलेवाडी, ता.कराड, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९७ / सातारा | माहिती अधिकारी, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि. यशवंत नगर,चिखली, ता.शिराळा, जि.सांगली | प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | जानेवारी २००१ ते जानेवारी २००७ या कालावधीतील ऊस बिलाच्या रकमे बाबतची माहिती | ऊस बिलातून वसूल केलेली रक्कम परत करण्याबाबतची अपीलकर्त्याची मागणी आहे.<br>कारखान्याकडून येणेबाकी असलेली रक्कम ऊस बिलातून वसूल केलेली आहे व तो कार्यवाहीचा विषय आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार मागणी केलेली माहिती पंधरा दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. अपीलकर्त्याने त्याबाबत सहमती दर्शविली. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१०.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८१+९८२+९८३+९८४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजय ईश्वर नितनवरे<br>चारचाळ, रू.नं.एनक्यूसी-१४, पुणे उरो व सामान्य रूग्णालय, औंध, पुणे-२७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासकीय अधिकारी,<br>उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री. संजय ईश्वर नितनवरे यांनी दि. ७.४.२००७, दि. ६.३.२००७, दि. १६.४.२००७ दि.३.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये १) सन २०००.२००२ मधील वर्ग ३, ४ च्या नियुक्त्या, दि. ९.७.२००४ पासून आंतर मंडल बदल्या, सन २००४ पासून बदल्यांची माहिती, वर्ग ३, ४, सन २००४ पासून सरळ सेवा भरती २) उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांची आंतर मंडल बदलीसाठी पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत, ३) दि. ३०.३.२००७ ते दि. २.४.२००७ रोजीच्या जावक नोंदवहीची व मुद्रांक नोंदवहीच्या छायांकित प्रती, ४) दि. २६.९.२००० ते दि. १२.९.२००२ मधील नियुक्त्या व बदली बाबतची माहिती मुख्य प्रशासकीय अधिकारी, उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्याकडे मागितली होती.

माहिती शुल्क भरण्यास कळवूनही अपीलकर्त्याने ते अद्याप भरले नसल्याचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. अपीलकर्त्याने शुल्क न भरता प्रथम व द्वितीय अपील केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. रू.२२४६/- शुल्क भरून अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी, तथा प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, [illegible], पुणे मंडळ, पुणे यांच्याकडून माहिती घ्यावी.

पुणे
दि. १५ .१०.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ